जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४१ दिनांक - १४/०७/२०२३**

## युनिट ४, गुन्हे शाखा,पुणे शहर

## रात्रीच्या वेळी पालघनचा धाक दाखवुन,वाटसरुना लुटणारी टोळी जेरबंद करून, त्यांचेकडुन दोन जबरी चोरीचे गुन्हे केले उघड

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी पुणे शहरातील शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द दाखल गुन्ह्यांचा समांतर तपास करुन सदरचे गुन्हे उघडकिस आणणे बाबत तसेच फरारी व पाहिजे आरोपी यांचा शोध घेऊन मिळुन आल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

प्राप्त आदेशाचे अनुषंगाने श्री.गणेश माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा,युनिट-४,पुणे शहर यांनी वरिलप्रमाणे विशेष मोहिम राबवुन कार्यवाही करणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले. प्राप्त आदेश व सुचनेप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक,जयदीप पाटील,पोलीस अंमलदार,संजय आढारी, प्रविण भालचिम, विनोद महाजन, नागेश सिंग कुँवर,स्वप्निल कांबळे असे पोलीस ठाणे **विमानतळ गु.र.नं.३२७/२०२३,भा.द.वि.कलम ३९२,३४ व पोलीस ठाणे येरवडा गु.र.नं.४४३/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४** या अनोळखी आरोपीतां विरुद्ध दाखल गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते.

तपासा दरम्यान **पोलीस अंमलदार, विनोद महाजन व नागेशसिंग कुँवर** यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, विमाननगर मधिल सिम्बोयसिस कॉलेज जवळ व कल्याणीनगर,येरवडा येथे रात्रीचे वेळी धारधार शस्त्राचा धाक दाखवुन गुन्हे करणारे आरोपी गौरव ऊर्फ सलमान खान, साहिल ऊर्फ मोबासाई शेख व कैफ शेख हे तिघे पार्किंग नं.०३ संगमवाडी पुणे येथे बसले आहेत अशी खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने नमुद ठिकाणी तात्काळ स्टाफ पाठवुन आरोपीतांना कायदेशीर कारवाई कामी ताब्यात घेणेबाबत आदेशीत केले. त्याप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक,जयदीप पाटील,पोलीस अंमलदार यांनी बातमीच्या ठिकाणी तात्काळ जावुन, आरोपी नामे **१)साहिल ऊर्फ मोबासाई समीर शेख,वय-२१,रा.यशवंतनगर मच्छि मार्केट मागे,शेलार चाळ, येरवडा,पुणे व एक बालअपचारी यांना शिताफीने ताब्यात घेतले.** ताब्यातील आरोपी व बालअपचारी यांच्याकडे सखोल तपास करुन,त्यांनी त्यांचे साथीदार (फरार) कैफ शेख व विजय ऊर्फडुड राठोड यांच्या मदतीने केलेले **१)पोलीस ठाणे विमानतळ गु.र.न.३२७/२०२३,भा.द.वि.कलम ३९२,३४ २)पोलीस ठाणे येरवडा गु.र.न.४४३/ २०२३,भा.द.वि. कलम ३९२,३४** हे दोन गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. तसेच आरोपीतांनी गुन्हा करण्याकरीता वापरलेली पालघन व १०,०००/- रु किमतीचा चोरीस गेलेला मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

नमुद आरोपीतांना पुढील कारवाईकरीता पोलीस ठाणे विमानतळ,पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पोलीस ठाणे विमानतळ आरोपींतांची पोलीस कोठडी रिमांड घेवुन त्यांच्याकडे पुढील तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे शाखा,श्री.अमोल झेंडे, मा.सहा. पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतीश गोवेकर यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. गणेश माने, पोलीस उप-निरीक्षक,जयदीप पाटील, महेंद्र पवार सोबत सोबत पोलीस अंमलदार,संजय आढारी, प्रविण भालचिम, विनोद महाजन, नागेशसिंग कुँवर, स्वप्निल कांबळे या युनिट-०४ चे पथकाने केलेली आहे.